| | | |
|---|---|---|
| | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ६०१८ /२०२४ दिनांक :- २५ /०८ /२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**दहीहंडी उत्सवानिमीत्त करण्यात येणा-या वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

दिनांक २७/०८/२०२४ रोजी दहीहंडी उत्सव पुणे शहरात ठिकठिकाणी मोठया उत्साहात साजरा केला जातो. विशेषतः शहरातील मध्यवर्ती भागातील शिवाजीरोड, लक्ष्मीरोड, बाजीराव रोड, टिळक रोडवर सायंकाळी १७.०० वा. पासून दहीहंडी फुटे पर्यंत बुधवार चौक ते दत्तमंदीर चौक तसेच बेलबाग चौक ते सेवासदन चौक, बुधवार चौक ते अप्पा बळवंत चौ, मंडई चौक (बाबु गेणु चौक), साहित्य परिषद चौक, नवी पेठ इ. ठिकाणी भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्यावेळी सदर रस्त्यांवर कोठेही वाहतूकीची कोंडी होऊ नये व वाहनचालकांची गैरसोय होऊ नये, सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालावी याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकते नुसार व तेथील वाहतुकीच्या परिस्थितिनुसार वाहतुक व्यवस्थेमध्ये दि. **२७/०८/२०२४ रोजी सायंकाळी १७.०० वा.पासून** खालील प्रमाणे बदलाबाबतचे आदेश निर्गमित करीत आहे.

१. शिवाजीरोड वरुन स्वारगेटला जाणेकरीता :- स.गो.बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने खंडोजी बाबा चौक, टिळक चौक-पुढे टिळकरोडने/शास्त्री रोडने इच्छित स्थळी जातील.
२. पुरम चौकातुन बाजीराव रोडवरून शिवाजीनगर कडे जाणेकरीता :- पुरम चौकातुन टिळक रोडने - अलका टॉकीज चौक व पुढे एफ.सी.रोडने इच्छित स्थळी जातील. तसेच सणस पुतळा चौकामधुन सेनादत्त चौकाकडे व पुढे इच्छित स्थळी जातील.
३. स.गो.बर्वे चौकातुन पुणे मनपा भवनकडे जाणेकरीता :- स.गो. बर्वे चौकातुन जंगली महाराज रोडने - झाशी राणी चौक डावीकडे वळुन इच्छितस्थळी जातील.
४. बुधवार चौकाकडुन आप्पा बळवंत चौकाकडे एकेरी वाहतुक सोडण्यात येईल. आप्पा बळवंत चौकातुन बुधवार चौकाकडे येणारी वाहतुक बाजीराव रोडने सरळ पुढे इच्छितस्थळी जातील.
५. रामेश्वर चौक ते शनिपार चौकाकडे येणारी वाहतुक बंद करण्यात येत असुन पर्यायी मार्गाचा वापर करावा.
६. सोन्या मारुती चौकाकडुन लक्ष्मी रोडने सरळ सेवासदन चौकाकडे वाहतुकीकरिता बंद करण्यात येत आहे. सदरची वाहने सोन्या मारुती चौकातुन उजवीकडे वळुन फडके हौद चौकातुन इच्छित स्थळी जातील.
७. शिवाजी रोडवरुन जिजामाता चौकातून गणेश रोडने दारुवाला पुलकडे जाणारी वाहतूक हि गाडगीळ पुतळा येथून डाव्या बाजूने कुंभारवेस चौक- पवळे चौक- जुनी साततोटी पोलीस चौकी मार्गे इच्छितस्थळी जाईल.
८. गणेश रोडवरील संपूर्ण वाहतूक हि दारुवाला पुल येथुन बंद राहिल. तसेच देवजीबाबा चौक व फडके हौद चौकात वाहतूक बंद करण्यात येईल. वाहनचालकांनी अपोलो टॉकिज, नरपतगिरी चौक, दारुवाला पूल, दुधभट्टी या मार्गाचा वापर करावा.

सदर भागातील वाहतूक परिस्थिती नुसार **आवश्यकते प्रमाणे** बदल करण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी **सायंकाळी १७.०० ते दहीहंडी फुटे पर्यंत** उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करुन, वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

**( अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर

**प्रत** :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

CamScanner